CMYK

२५ वा सामना

Vs

चेन्नई सुपरकिंग्ज वि. कोलकाता नाईट रायडर्स

वेळ : ७.३० वा. स्थळ : चेन्नई

अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड



सोलापूर शहराचे तापमान

कमाल तपमान ३९.४

किमान तपमान २७.४

www.surajyadigital.com । शुक्रवार, दि. ११ एप्रिल २०२५ । वर्ष : २३ वे अंक : १९२ वा किंमत : ५ रुपये पाने ८

## माढा ग्रामीण रुग्णालयात आरोग्य सेवेचे धिंडवडे!

# सिझेरियन टाक्याच्या अवस्थेमधील ओल्या बाळंतिणीस दिल्या मरणयातना! चालणं अवघड...बसणं तर त्यापेक्षा अवघड...तरीपण करुन घेतली स्वच्छता!!

सोलापूर/खास प्रतिनिधी

**पुण्यातील दीनानाथ मंगेशकर रुग्णालयात उपचाराअभावी गर्भवती महिलेचा मृत्यू झाल्याची आणि आरोग्य विभागाच्या कारभाराचे धिंडवडे निघणारी तसेच अत्यंत निंदनीय घटना ताजी असतानाच, माढा येथील ग्रामीण रुग्णालयातील अत्यंत धक्कादायक आणि संतापजनक घटना समोर आली आहे. सिझेरियनद्वारे प्रसुती झालेल्या हेमा धडे या महिलेस ॲडमिट रुमची स्वच्छता करण्यास भाग पाडून तिला प्रसुती काळात अन् तेही सिझेरियनचे टाके घेतले असताना मरणयातना देण्याचा अमानवी प्रकार केला आहे.**



माढा : समोर आलेल्या बाळंतिणीच्या धक्कादायक प्रकारानंतर पाहणी करताना वरिष्ठ अधिकारी अन् शुभम साठे.



माढा : स्वच्छतेबद्दल कान उघडी केल्यानंतर स्वच्छतेसाठी सज्ज होत असलेला कर्मचारी.

माढा : उपचार घेता घेता स्वच्छतेचं काम करावे लागत असल्याची वस्तुनिष्ठ माहिती देणारी रुग्ण महिला.



- पाच दिवस रुमच्या स्वच्छतेवेळी भोगल्या अक्षरश: जीवघेण्या यातना
- डिलिव्हरी महिलांच्या ॲडमिट खोल्यांकडे स्वच्छतेसाठी कोणीच फिरकले नाहीत नियुक्त कर्मचारी
- कारवाईची बालंट टाळण्यासाठी रुग्णालय प्रशासनाची सारवासारव
- प्रसुत महिलेकडून रुमची तर टॉयलेटची तिच्या पतीकडून जबरदस्तीने करुन घेतली स्वच्छता
- खरं काय अन् खोटं कायचं रात्री उशीरापर्यंत पोस्टमार्टम

विशेष म्हणजे प्रसुत महिलेस तिच्या ॲडमिट वॉर्डची तर तिचा नवरा शैलेश धडे यांना रुग्णालयामधील चक्क टॉयलेटची स्वच्छता करण्यास भाग पाडले आहे. धडे दाम्पत्याची सर्वसामान्य आर्थिक परिस्थिती असल्यामुळे प्रसुतीसाठी हेमा यांना महागड्या खासगी रुग्णालयात दाखल करता आले नाही. मोफत उपचाराच्या माढा ग्रामीण रुग्णालयात दाखल करावे लागले, याच मजबुरीचा फायदा घेऊन धडे दाम्पत्याना नाईलाजाने स्वच्छतेचे काम करणे भाग पाडले.

तालुकास्तरावरील रुग्णालयात कर्मचाऱ्यांची संख्या तशी कमी नसावी, त्यातून कमी असेल तर कर्मचाऱ्यांची मागणी रुग्णालयाच्या अधीक्षकांनी केली आहे का? कर्मचारी कमी असतीलसुद्धा पण खुद्द सिझेरियन डिलिव्हरीच्या महिलेस स्वच्छता करण्यास लावण्याचा हा काय धक्कादायक प्रकार? हा मुद्दा आता उपस्थित झाला आहे.

माढा ग्रामीण रुग्णालयात घडलेल्या या अत्यंत धक्कादायक, लाजिरवाण्या प्रकाराची माहिती रुग्णालयातून बाहेर आल्यानंतर रुग्णालय अधीक्षक डॉ. विलास नेमाणे यांच्यासह अन्य अधिकारी तसेच कर्मचाऱ्यांनी सारवासारव करण्याचा प्रयत्न केला. या तालुक्यातील खैराव येथील ट्रॅक्टर ड्रायव्हर शैलेश धडे यांची पत्नी हेमा यांना ३० मार्च २०१४ रोजी तिसऱ्या अपत्याच्या प्रसुतीसाठी माढा ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. मंगळवार ता.१ एप्रिल २०२५ रोजी त्यांची सिझेरियनद्वारे प्रसुती झाली. मुलगा जन्मला. सिझेरियनने टाके घेतलेले होते, त्या अवस्थेत त्यांना चालायला येत नव्हतं, बसणं तर त्यापेक्षा अवघड होतं. तरीपण मरणयातना सहन करीत हेमा यांना दवाखान्यातील वॉर्डची स्वच्छता स्वत: करावी लागली. एकनाथ शिंदे शिवसेना गटाचे माढ्याचे नेते शुभम साठे यांनी हा धक्कादायक प्रकार समोर आणीत कारवाईसाठी पाठपुरावा केला.

### कर्मचाऱ्यांना सांगायला गेल्यावर बसायचे गप्प

रुमसह टॉयलेटमधील स्वच्छता करा, असं सांगायला गेल्यानंतर रुग्णालयामधील संबंधित कर्मचारी हे ऐकून न ऐकल्यासारखे करायचे. स्वच्छतेसाठी कोणीच फिरकत नसायचे. रुग्णालयाचे मोठे डॉक्टर भेटत नसायचे, त्यातून नाईलाज झाला. स्वच्छता करीत राहिले असे हेमा यांचे पती शैलेश यांनी सांगितले.

> माढा ग्रामीण रुग्णालयात घडल्या प्रकाराची चौकशी सुरु केली आहे, याप्रकरणाची माहिती हाती आल्यानंतरच या प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर बोलता येईल. तेच योग्य राहील. शुक्रवारी (ता.११) या प्रकरणाबद्दल आम्ही माध्यमांना माहिती देऊ.
>
> **- डॉ.सुहास माने** (सिव्हील सर्जन, सोलापूर)

> या रुग्णालयाकडे ठेकेदारीवर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांची मुदत १ तारखेला संपलेली आहे. तद्नंतर आस्थापनावरील कर्मचाऱ्यांकडून रुग्णालयातील स्वच्छता करुन घेतली जात आहे. हेमा धडे ही महिली प्रसुतीसाठी या रुग्णालयात दाखल होती, तिने दाखल खोलीमधील वॉकर जवळची स्वच्छता केली असावी. पूर्ण खोलीसाठी स्वच्छता कर्मचारी होते.
>
> **-डॉ. विलास नेमाणे** (अधीक्षक, ग्रामीण रुग्णालय, माढा)

### टॉयलेटमधील दुर्गंधीमुळे बाळंतीण महिलेसह बाळास आजार होईल म्हणून केली स्वच्छता

रुग्णालयात पत्नीला ज्या खोलीत दाखल केले होते, तिथेच इतर महिलांसाठीच्या वापराचेदेखील टॉयलेट होते. या टॉयलेटच्या स्वच्छतेसाठी कोणी येत नव्हते. टॉयलेटमधून अत्यंत दुर्गंधी येत होती. जणू नरकयातना भोगाव्या लागत होत्या. अशातच दुर्गंधीमुळे आई आणि बाळ यांना वेगळा आजार होईल म्हणून मी स्वत: पाच दिवस टॉयलेट साफ करत होतो, असे हेमा धडे यांचे पती शैलेश यांनी सांगितले.

### बाळासाठी मरणयातना अन् नरकयातना एकाच वेळी

बाळंतपण ओलं असताना टाक्याच्या अवस्थेत रुमची स्वच्छता करावी लागायची त्यावेळी अक्षरश: मरणयातना भोगायला लागायच्या शिवाय रुमजवळील टॉयलेटमधून अत्यंत दुर्गंधी यायची, त्यावेळी जणू काही नरकयातना भोगाव्या लागायच्या. बाळासाठी बिचाऱ्या हेमा यांना मरणयातना आणि नरकयातना एकाच वेळी भोगण्याची पाळी आली.

### गुरुवारी रात्री उशीरापर्यंत 'पोस्टमार्टम'

माढा ग्रामीण रुग्णालयामधील त्या धक्कादायक आणि संतापजनक प्रकाराबद्दल गुरुवारी रात्री उशीरापर्यंत जाबजबाब नोंदविण्याचे काम सुरु होते. ज्या ओल्या बाळंतिणीस स्वच्छता करण्यास भाग पाडले तिला खैराव येथून बोलावून घेऊन तिचाही जबाब नोंदविण्यात आल्याचे सांगण्यात आले.

## कुमठेगावात तरुणाची गळफास घेऊन आत्महत्या

**सोलापूर** : कुमठेगाव (ता.उत्तर सोलापूर) येथे राहणाऱ्या एका २४ वर्षीय तरुणाने राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना बुधवारी रात्रीच्या सुमारास उघडकीस आली.

मजहर बाबू शेख (वय २४ रा.कुमठेगाव) असे मयताचे नाव आहे. त्याच्या घरातून दुर्गंधी येत असल्याने पोलीस तसेच आजूबाजूच्या लोकांनी दरवाजा तोडला असता त्याचा मृतदेह छताच्या लोखंडी अँगलला शालीच्या सहाय्याने गळफास घेतलेल्या अवस्थेत आढळून आला. मझहर शेख हा अविवाहित असून त्याला दारूचे व्यसन होते. तो मजुरी करीत होता. तो घरात एकटाच राहत होता.

## प्रेम संबंधाला विरोध; मुलाकडून आईचा खून

### दोन आरोपी ताब्यात; अक्कलकोट तालुक्यातील घटना

अक्कलकोट/प्रतिनिधी

प्रेम संबंधाला विरोध केल्यामुळे मुलानेच आईचा गळा दाबून खून केला. ही घटना सिन्नुर (ता.अक्कलकोट) येथे १० एप्रिल रोजी दुपारी घडली. याप्रकरणी पोलिसांनी दोघांना ताब्यात घेतले आहे.

भिमबाई हणमंत कळसगोंड (वय ४८, रा सिन्नुर, ता. अक्कलकोट) असे खून झालेल्या महिलेचे नांव आहे. रमेश हणमंत कळसगोंड व गायत्री गुरप्पा जेवरगी दोघे (रा. सिन्नुर ता. अक्कलकोट) यांच्या विरोधात अक्कलकोट दक्षिण पोलीस ठाण्यात खुनाचा गुन्हा दाखल झाला. पती हणमंत भागप्पा कळसगोंड (वय ५४) यांनी फिर्याद दिली. रमेश व गायत्री या दोघांचे प्रेम संबंध होते. याला भीमबाईचा विरोध होता. गुरूवारी साडेअकराच्या सुमारास संगप्पा गणपती उजनी यांच्या शेतात भीमबाई या हिचा रमेश आणि गायत्री या दोघांनी तिच्याच अंगावरील साडीच्या पदराने गळा आवळून खून केला. पोलिसांनी दोन्ही आरोपींना ताब्यात घेतले आहे. तपास स.पो.नि. सुरवसे करत आहेत. घटनास्थळाला पो.नि. महेश स्वामी व स.पो.नि. साईनाथ सुरवसे यांनी भेट दिली.

## आमचे सरकार योग्य वेळी शेतकऱ्यांची कर्जमाफी करेल : बावनकुळे

**रायगड** : गेल्या अनेक दिवसांपासून लाडकी बहीण योजना, शेतकरी कर्जमाफी या मुद्द्यांवरून विरोधक सत्ताधाऱ्यांना घेरण्याचा प्रयत्न करत आहे. विधानसभा निवडणुकीत दिलेली आश्वासने सत्तेत आल्यावर महायुती सरकार विसरले.

महायुती सरकार लाडकी बहीण योजनेचे २१०० रुपये आणि शेतकरी कर्जमाफी कधी करणार, असे प्रश्न सातत्याने विरोधक करत आहेत. यासंदर्भात आता भाजपा नेते आणि राज्याचे मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी स्पष्ट शब्दांत भाष्य केले आहे.

### तिसरा डोळा

– प्रकाश पोरे



दुरुस्ती झाली की परत येतो म्हणालेत!

संगम श्री डे
445-34-789

संगम श्री नाईट
136-02-679

कल्याण
277-63-670

मुंबई
457-68-459

### दूषित पाण्याचे मुलींचे मृत्यू प्रकरण

# दोषी असलेल्या अधिकाऱ्यांवर कारवाई करा; पालकमंत्र्यांचे आदेश

### म्हेत्रे परिवारास मुख्यमंत्री निधीतून पाच लाख देण्याची ग्वाही

सोलापूर/प्रतिनिधी

**बाबू जगजीवनराम झोपडपट्टीतील मृत पावलेल्या ममता अशोक म्हेत्रे, जिया महादेव म्हेत्रे या मुलींचा झालेला मृत्यू दुर्दैवी आहे. या प्रकरणाची चौकशी करावी, दोषी असलेल्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याचे आदेश पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी महापालिका आयुक्तांना दिले आहेत. म्हेत्रे परिवारास मुख्यमंत्री निधीतून पाच लाख देण्याची ग्वाहीही त्यांनी यावेळी दिली.**



सोलापूर : महापालिकेत आयोजित बैठकीप्रसंगी पालकमंत्री जयकुमार गोरे, आ. सुभाष देशमुख, आ. देवेंद्र कोठे, आयुक्त सचिन ओम्बासे, अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे व इतर.

पालकमंत्री जयकुमार गोरे हे गुरुवारी सायंकाळी सोलापूर दौऱ्यावर आले होते. त्यांनी बाबू जगजीवनराम झोपडपट्टीत जाऊन दोन्ही म्हेत्रे कुटुंबियांची भेट घेऊन सांत्वन केले. यावेळी त्यांच्यासमवेत आमदार देवेंद्र कोठे, शिवसेनेच्या राज्य प्रवक्त्या प्रा. ज्योती वाघमारे, महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे उपस्थित होते.

या भेटीनंतर पालकमंत्र्यांनी महापालिकेत येऊन आयुक्त डॉ. सचिन ओंबासे यांच्या समवेत बैठक घेतली. यावेळी आमदार सुभाष देशमुख, आमदार देवेंद्र कोठे, पोलीस आयुक्त एम. राजकुमार , अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, उपायुक्त आशिष लोकरे भाजपचे शहराध्यक्ष नरेंद्र काळे, डॉ. ज्योती वाघमारे, माजी नगरसेवक अनंत जाधव आदी उपस्थित होते.

बैठकीनंतर पत्रकारांशी बोलताना पालकमंत्री जयकुमार गोरे म्हणाले, या घटनेसंदर्भात आपण मुख्यमंत्र्यांना कळविल्यावर मुख्यमंत्र्यांनी प्रत्येकी पाच लाख रुपये देण्यासंदर्भातील निर्णय मला एसएमएसद्वारे कळविले आहे. या मदतीसंदर्भातील प्रस्ताव महापालिका आयुक्तांकडून शासनाकडे पाठविला जाणार आहे.

या दोन्ही मुलींचा मृत्यू डेंग्यूने झाला नसून अंतिम निष्कर्ष अद्याप निघणे बाकी आहे. लवकरच वैद्यकीय अहवाल आल्यावर या संदर्भातील स्पष्टता समोर येणार आहे. जगजीवनराम झोपडपट्टीत गटारींतून जलवाहिनी गेल्याने दुर्दैवी घटना घडली. या गटारींतून जलवाहिनी बाहेर काढण्यासाठी तातडीने उपाययोजना करण्याचे आदेश आपण जिल्हाधिकाऱ्यांना दिले आहेत. शहराच्या अन्य भागात गटारींतून जलवाहिनी गेली असेल तर या संदर्भात सर्वे करून आवश्यक उपाययोजना करण्यात येणार आहेत. शहरातील अंतर्गत जलवाहिनी बदलण्यासाठी मुख्यमंत्र्यांनी ८९२ कोटींचा निधी मंजूर केला असून यातील शंभर कोटींचा पहिला हप्ता लवकरच दिला जाणार आहे. असेही त्यांनी सांगितले. झालेल्या घटनेच्या मुळाशी जावे लागणार आहे. या झोपडपट्टीत तातडीचा मदत कक्ष उभारण्यात येणार आहे, असेही पालकमंत्री म्हणाले.

गटारींच्या पाण्यातून गेलेल्या जलवाहिनीला वेगळे करण्यासाठी पालकमंत्र्यांनी २ कोटींचा निधी जाहीर केला. जिल्हाधिकाऱ्यांनी कार्यवाही सुरू करावी अशा सूचना दिल्या.

### कारागृहात पाणीटंचाई; उपाययोजना करण्याचे आदेश

जिल्हा कारागृहातील पाणीटंचाईची समस्या अतिशय गंभीर बाब असून यासंदर्भात आवश्यक उपाययोजना करण्याचे आदेश आपण महापालिका प्रशासनाला दिले आहेत, असेही पालकमंत्री गोरे यांनी यावेळी स्पष्ट केले.

### मराठा वस्तीत नवीन पाईपलाईनसाठी ७८ लाख मंजूर

महापालिकेतील बैठकीनंतर माजी नगरसेवक अनंत जाधव यांनी मराठा वस्तीतही दुषित पाणी येत असल्याचे सांगत नवीन पाईपलाईनची मागणी केली. याला ७८ लाखांचा खर्च असल्याचे जाधव यांनी सांगितले. पालकमंत्र्यांनी याला तत्काळ मंजुरी देत लगेच निविदा प्रकिया राबवण्याचे आदेश दिले.

CMYK